महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ९५ वे | दिनांक : २९/०३/२०२६ | वार : रविवार

## गॅस तुटवडा नसताना रॉकेल वाटप का ? भास्कर जाधवांचा सवाल; अफवांवर भाजपवर निशाणा





**मुंबई :** राज्यातील इंधन टंचाई, गॅसचा तुटवडा आणि वाढत्या भोंदूगिरीच्या प्रकरणावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर सडकून टीका केली आहे. "एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः देशात कोरोनासारखी स्थिती पुन्हा उद्भवू शकते असे सांगून इशारा देत आहेत, तर दुसरीकडे राज्यातील मुख्यमंत्री कशाचाही तुटवडा नसल्याच्या बढाया मारत आहेत," अशा शब्दांत जाधवांनी केंद्र आणि राज्य सरकारमधील विसंगतीवर बोट ठेवले. तसेच "गॅसचा तुटवडा नाही म्हणता, मग केरोसिन का देता?" असा सवाल करत, "अफवा पसरवण्यात भाजपचा कोणीही हात धरू शकत नाही," असा टोलाही त्यांनी यावेळी लगावला.

अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धामुळे निर्माण झालेल्या जागतिक तणावाचा परिणाम भारताच्या इंधन पुरवठ्यावर होत आहे. राज्यातील विविध शहरांत स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे. एलपीजी सिलेंडरसाठी नागरिकांच्या रांगा लागत आहेत. एलपीजी संकटावर मात करण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने आता केरोसिन देण्यात येणार आहे. तर देशात आणि राज्यात इंधनाचा तुटवडा नाही, एलपीजी गॅस आणि पेट्रोल-डिझेलचा मुबलक साठा असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले. यावरून भास्कर जाधव यांनी सरकारवर निशाणा साधला आहे.

राज्यातील पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी गॅसच्या तुटवड्यावरून सरकारला जाब विचारताना भास्कर जाधव म्हणाले की, आज अनेक ठिकाणचे पेट्रोल पंप बंद आहेत आणि गॅस सिलिंडरसाठी नागरिकांना वणवण करावी लागत आहे. जर तुमच्याकडे साठा भरपूर आहे, तर मग राज्यात बंद असलेले केरोसिन रेशनवर देण्याचा निर्णय सरकारने का घेतला?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांच्या विधानांमध्ये मोठी तफावत असून, जनतेची दिशाभूल करण्याचे काम सरकार करत असल्याचा आरोप भास्कर जाधव यांनी केला.

काँग्रेसच्या काळात साडेतीनशे रुपयांना मिळणारा गॅस आज बाराशे रुपयांच्या पार गेला असूनही भाजपवाले केवळ काँग्रेसवर टीका करण्यात धन्यता मानत आहेत. आजच्या परिस्थितीला नेहरू किंवा उद्धव ठाकरे जबाबदार आहेत असे भाजपने अद्याप म्हटले नाही, याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो, असा उपरोधिक टोलाही भास्कर जाधव यांनी लगावला.

राज्यातील वाढत्या भोंदूगिरीच्या प्रकरणांनाही भास्कर जाधव यांनी थेट भाजपच्या विचारसरणीशी जोडले. 2014 पासून देशात अंधश्रद्धेला जाणीवपूर्वक खतपाणी घातले जात असून, त्यातूनच भोंदूबुवा आणि तथाकथित साधू-महाराजांचे पेव फुटल्याचे त्यांनी नमूद केले. "अनेकांना वाटते की बाबा-बुवांच्या पाया पडल्याशिवाय सत्तेचा मुकुट मिळणार नाही. राजकारण्यांच्या अशा वर्तनामुळे सर्वसामान्य जनतेमध्येही चमत्कारांवर विश्वास ठेवण्याची चुकीची प्रवृत्ती बळावत आहे. सिन्नरचे अशोक खरात प्रकरण हा याच विकृत मानसिकतेचा एक भाग आहे," अशी घणाघाती टीका त्यांनी केली.

**राजसत्ता आणि धर्मसत्तेची गल्लत**

भास्कर जाधव यांनी राजसत्ता आणि धर्मसत्ता या वेगवेगळ्या असायला हव्यात, असे मत व्यक्त केले. जेव्हा राजकारणी आपल्या सत्तेसाठी धर्माचा आणि अंधश्रद्धेचा वापर करतात, तेव्हा त्यांचा विवेक नष्ट होतो. अशा अघोरी प्रवृत्तींमुळे राज्याची प्रतिमा मलीन होत असून, सर्वसामान्य जनतेची दिशाभूल केली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी व्हावी आणि जनतेला इंधन टंचाईतून दिलासा मिळावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## इंधन पुरवठ्याबाबत अफवा पसरवली, भाजप नेत्याच्या पंपावर कारवाई



**पुणे :** इंधन उपलब्धतेबाबत अप्रमाणित माहिती पसरवून नागरिकांमध्ये घबराट निर्माण केल्याप्रकरणी पुणे कॅन्टोनमेंट परिसरातील हायवे पेट्रोलियम सेंटर (पूलगेट) या पेट्रोल पंपावरील विक्री व इंधन पुरवठा तात्काळ प्रभावाने स्थगित करण्यात आला आहे.

संबंधित पेट्रोल पंप हा भाजप नेते आणि ऑल इंडिया पेट्रोल डीलर्स असोसिएशनचे कोर कमिटी मेंबर अली दारूवाला यांचा आहे. याबाबत अली दारूवाला यांना विचारणा केली असता, त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे.

तेल कंपनीकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, संबंधित पेट्रोल पंपाकडून पेट्रोल व डिझेल तुटवड्याबाबत निराधार अफवा पसरविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब मार्केटिंग डिसिप्लिन गाईडलाइन्स 2024 अंतर्गत "गंभीर अनियमितता" म्हणून गणली जाते. डीलरशिप करारातील अटींचे उल्लंघन झाल्याने संबंधित कारवाई करण्यात आली आहे.

सध्याच्या परिस्थितीत तेल विपणन कंपन्यांकडून इंधनाचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याबाबत जनजागृती केली जात असताना, अप्रमाणित माहिती प्रसारित केल्यामुळे इतर पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी व गोंधळ निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये यासाठी ही कारवाई करण्यात आली आहे.

सदर पेट्रोल पंप चालकास 24 तासांच्या आत लेखी स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असून, समाधानकारक उत्तर न मिळाल्यास डीलरशिप रद्द करण्यासह पुढील कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे तेल कंपनीच्या पुणे प्रादेशिक कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आल्याची माहिती जिल्हा पुरवठा कार्यालयाकडून देण्यात आली.

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

## ३९ आमदार भेटून गेलेले असताना माझेच नाव का? दिपक केसरकर

**मुंबई :** भोंदू अशोक खरात प्रकरणात नाव ओढले गेल्याने शिवसेना नेते आणि आमदार दीपक केसरकर यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. "अनेक नेत्यांचे खरातसोबतचे फोटो समोर आले आहेत, मात्र केवळ ओळख असणे म्हणजे संबंधित व्यक्तीच्या कृत्यात सहभागी असणे असा होत नाही," अशा शब्दांत केसरकर यांनी आपले स्पष्टीकरण दिले. या प्रकरणाशी आपला संबंध जोडण्याचा प्रयत्न हा केवळ राजकीय द्वेषापोटी केला जात असून, यामध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आघाडीवर असल्याचा थेट आरोप त्यांनी पत्रकार परिषदेत केला.

आमदार दीपक केसरकर यांचा नाशिकच्या बहुचर्चित अशोक खरात प्रकरणात संबंध असल्याचा आरोप होत आहे. दीपक केसरकर यांचे अशोक खरात याच्यासोबतचे काही फोटो देखील समोर आले आहेत. दीपक केसरकर शिक्षण मंत्री असताना, त्यांच्या खात्यातील कारभार हा अशोक खरात याच्या सांगण्यावरून होत असल्याचा आरोप ठाकरे गटाने केला होता. आता दीपक केसरकर यांनी पत्रकार परिषद घेऊन विरोधकांचा समाचार घेतला आहे.

दीपक केसरकर म्हणाले, मी देवभक्त आहे, मी न चुकता शिर्डीला येतो. ते जे ईशान्येश्वर मंदिर आहे ते शिर्डीला येण्याच्या वाटेवर आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २९ मार्च २०२६


## मराठवाड्याची देवगिरी लिंगम्पल्ली पर्यंत पळवली :रायलसिमा परभणी पर्यंत कधी



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तिरुपती ला जाण्यासाठी नांदेड आणि परभणीतून नियमित रोज रेल्वे नाही म्हणून निझामाबाद - तिरुपती रॉयल सीमा एक्सप्रेस ही रेल्वे परभणी पर्यंत वाढवण्याची मागणी बालाजी भक्त करीत आहेत मराठवाड्यातील रेल्वे प्रवास्यांच्या सोई साठी सुरु करण्यात आलेली पूर्वीची नांदेड मुंबई देवगिरी एक्सप्रेस अगोदर नांदेड येथून चं सुटायची परंतु ती काही दिवस सिकंद्राबाद पर्यंत पळवली मग पुढे लिंगम्पल्ली पर्यंत ती रेल्वे आता जात आहे पण हजारो भक्तांना सोई ची ठरू शकणारी निझामाबाद तिरुपती रॉयल सीमा सुपर फास्ट एक्सप्रेस रेल्वे परभणी पर्यंत का येऊ शकत नाही?असा सवाल आता मराठवाड्यातील खासदार महोदयांना बालाजी भक्त विचारत आहेत रॉयलसीमा रेल्वे परभणी पर्यंत वाढवल्यास हजारो बालाजी भक्तांना उत्तम सोय होणार असून दररोज हजारो भक्त तिरुपतीत दर्शनाला जातात व्यापारी दृष्टीने सिकंद्राबाद पर्यंत पण रेल्वे प्रवास्यांची मोठी सोय होणार आहे म्हणून मराठवाड्या तील खासदारांनी आता हा विषय रेल्वे मंत्री यांच्या कडे लावून धरला पाहिजे ही रेल्वे परभणी पर्यंत झाल्यास वेळेची बचत आणि थेट सुविधा होईल असा विश्वास परभणी जिल्हा भाजपा चे व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष प्रदीप कोकडवार यांनी व्यक्त केला आहे


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क | एम.फिल-पी.एच.डी. थेसिस | मराठी, हिंदी, इंग्रजी | कलर प्रिंट स्कॅनिंग | झेरॉक्स | स्पायरल बायंडिग | लॅमिनेशन | थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103


## छत्रपती संभाजीनगरमध्ये 'तिफण' राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा ३ एप्रिलला

**छत्रपती संभाजीनगर :** त्रैमासिक तिफण आणि तिफण वाचक चळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३ एप्रिल २०२६ (शुक्रवार) रोजी सकाळी ११ वाजता तिफण राज्यस्तरीय उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित केला आहे. सोबत निमंत्रितांचे कविसंमेलन होणार आहे. स्थळ: महात्मा गांधी स्मारक निधी भवन (शासकीय ग्रंथालयाजवळ).आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रमुख अतिथी ज्येष्ठ लेखिका मा. ललिता गादगे असतील, तर अध्यक्षस्थान ज्येष्ठ साहित्यिक-समीक्षक मा. डॉ. वासुदेव मुलाटे भूषवतील. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. विजय भोसले (शिवाजी महाविद्यालय, कन्नड), मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. सर्जेराव जिगे, डॉ.बा.आं.म. विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख मा. प्रा. डॉ. रमेश जाधव आणि महात्मा गांधी स्मारक निधी भवनाचे कार्याध्यक्ष मा. डॉ. मच्छिंद्र गोर्डे प्रमुख उपस्थिती लावतील.यंदाच्या पुरस्काराचे सन्मानार्थी आहेत: रमेश चिल्ले, प्रा. केशव वसेकर, डॉ. वैशाली गुंजेकर, अरुण नवले, माणिक पुरी, अलकनंदा घुगे, चुडामन बल्हारपुरे, डॉ. मंदा नांदुरकर.कविसंमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध कवी मा. रमेश रावळकर असतील. निमंत्रित कवींमध्ये सुभाष बागल, सुखदेव पोटदुखे, गुंजन पाटील, मोहन सौंदर्य, युवराज धबडगे, प्रिया धारूरकर, डॉ. ज्योती सोनवणे, आशा डांगे, माधुरी चौधरी, शमा बरडे यांसह एकूण ३६ कवींचा सहभाग निश्चित झाला आहे.संयोजक: प्रा. डॉ. शिवाजी हुसे (संपादक, तिफण), प्रा. डॉ. दिलिप बिरुटे (अध्यक्ष, तिफण वाचक चळवळ) व संपादक मंडळातील प्रा. डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. नवनाथ गोरे. आयोजकांनी साहित्य-रसिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.


### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.


## वसतिगृह दिनाचा जल्लोष : विद्यार्थिनींच्या कलागुणांचा देखणा आविष्कार



**छत्रपती संभाजीनगर :** सौ. इं. भा. पा. महिला महाविद्यालयाच्या मुलींच्या वसतिगृहात 'वसतिगृह दिन' अत्यंत उत्साहपूर्ण, आनंदमयी आणि संस्मरणीय वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थिनींमधील सुप्त कलागुणांना वाव देणे आणि परस्परांतील स्नेह दृढ करणे हा या कार्यक्रमामागील मुख्य उद्देश होता.कार्यक्रमाची सुरुवात सपना शिंदे, रोहिणी भिवसने आणि वैष्णवी सुरडकर यांच्या मधुर स्वागतगीताने झाली. त्यानंतर गौरी दाभूड आणि पूजा मांदळे यांनी आपल्या ओघवत्या व प्रभावी सूत्रसंचालनातून संपूर्ण कार्यक्रम रंगतदार बनवला.या प्रसंगी वसतिगृहातील शिस्त, वागणूक आणि अभ्यासातील सातत्य यांचा विचार करून पूजा मांदळे हिला 'आदर्श वसतिगृह विद्यार्थिनी' म्हणून सन्मानित करण्यात आले. तसेच विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थिनींना मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.विद्यार्थिनींच्या मनोगतांनी कार्यक्रमाला भावनिक स्पर्श दिला. स्नेहल भरीतकर आणि अनुजा गोऱ्हाडे यांनी वसतिगृहातील आपले अनुभव सांगताना येथे मिळणारी सुरक्षितता, शिस्त आणि अभ्यासासाठी पोषक वातावरण यावर विशेष भर दिला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या प्राचार्य डॉ. सुनीता बाजपेयी यांनी आपल्या भाषणात पालकांना आश्वस्त करताना सांगितले की, "वसतिगृहातील प्रत्येक विद्यार्थिनीची आम्ही घरच्यांप्रमाणे काळजी घेतो. त्यांच्या अडचणी ऐकून त्यावर योग्य तो मार्ग काढण्याची संधी आम्ही त्यांना देतो."तसेच प्रा. अग्रवाल मॅडम यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना वसतिगृह हे 'दुसरे घर' असल्याचे सांगत शिस्तबद्ध व समतोल जीवनशैली अंगीकारण्याचा सल्ला दिला.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वसतिगृह अधीक्षक प्रज्ञा शिराढोणकर यांनी काटेकोर नियोजन केले. त्यांना प्राचार्यासह वसतिगृह समिती सदस्य डॉ. अग्रवाल, डॉ. सेनाड आणि डॉ. श्रीगिरीवार यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यालय अधीक्षक अर्चना कुलकर्णी व जोशी सर यांची सहकार्य लाभले.कार्यक्रमाच्या यशात सुपरवायझर ज्योती आढवे, मिनाक्षी महागडे, काताबाई दाणे तसेच मेस संचालिका आरती देशपांडे यांचा मोलाचा वाटा होता. कार्यक्रमाची सांगता प्रिया कवटकवार हिने आभार प्रदर्शनाने झाली.

## पुनम मुरलीधरराव साबळे सावंत यांना पीएच. डी.



**कन्नड (शीवाजी हुसे) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पुनम मुरलीधरराव साबळे - सावंत यांना मराठी विषयात पीएचडी प्रदान केली आहे. कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रा. डॉ. रामचंद्र झाडे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी "मराठवाड्यातील वारकरी संत परंपरेचे साहित्य: एक अभ्यास" या विषयावरती शोध प्रबंध विद्यापीठास सादर केला होता. त्यास विद्यापीठाने मान्यता देवून त्यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली. त्यांची मौखिक परीक्षा विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. रमेश जाधव यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन पद्धतीने संपन्न झाली. बहिस्थः परिक्षक म्हणून सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे उपस्थित होते. पुनम साबळे यांचे शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे, डॉ. प्रतिभा अहिरे,मराठी विभाग प्रमुख प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, मार्गदर्शक डॉ. रामचंद्र झाडे, प्रीतम सावंत यांनी अभिनंदन केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २९ मार्च २०२६


## आईस्क्रीमचा कोण

आईस्क्रीमचा कोण
एका जागी कंटाळला
फ्रिजचे दार उघडून
बाहेर आला

लगबगीने टेबलावर
दिमाखात बसला
बाहेरची वर्दळ पाहून
मनात हसला

सामार सुमार पाहून
रस्त्यावर तो आला
बाहेरच्या वातावरणात
पार घाबरून गेला

सूर्याने वटारले
वरून डोळे
आईस्क्रीमचा कोण
जोरजोराने पळे

पळता पळता
वितळून तो गेला
घाबरत कसाबसा
घरी आला

फ्रिजमध्ये जावून
एकदाचा बसला
संकटातून वाचल्याने
मनात हसला



- **रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT — कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर) — पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY — कालावधी १ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN — कालावधी १ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G. — कालावधी १ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN — कालावधी २ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY — कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर) — पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्टोमेट्री — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903


## समजावून यार सांगा !

जिकडे पहा तिकडे, सर्वत्र लागले आहेत रांगा.
सांगा ना भाऊ आता, कसे तुटतील या रांगा.

अडेलतट्टू धोरणामुळे, पेट्रोल गॅस तुटवडा झाला.
पेट्रोल गॅस मिळवण्यास, लागल्या आहेत रांगा.
माझं खरं माझं खरं म्हणण्यात, युद्ध झाले सुरू.
कोणीतरी माघार घेऊन, संपवतील का या रांगा.
जपून जपून वापरताना, संपून जाईल की सर्व.
पुन्हा एकदा गावाकडे, जाताना दिसतील रांगा.
रांगेत उभा राहिल्यावर, आठवते जुना टांगा.
इथे पहा तिथे पहा, सर्वत्र दिसत आहेत रांगा.
कोणीतरी ट्रम्प तात्याला,समजावून यार सांगा.
पेट्रोल गॅसच्या टंचाईमुळे,दिसत आहेत इथे रांगा.

आतातरी कोणी म्हणेल का, युद्ध नको बुद्ध हवा.
शहाणपणाने संपवून टाकू, लागलेल्या या रांगा.

**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## "तथागत गौतम बुद्ध हेच जागतिक पटलावरचे प्रथम मनो वैज्ञानिक" जेष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. शंकर खोब्रागडे यांचे प्रतिपादन



**नागपूर (चंद्रशेखर पाटील) :** डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातर्फे स्मृतिशेष डॉ. मधुकरराव वासनिक यांच्या द्वितीय पुण्य स्मरण दिना निमित्य स्मृती व्याख्यान मालेचे आयोजन

स्थानिक डॉ. मधुकरराव वासनिक पी डब्ल्यू एस कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कामठी रोड नागपूर येथे पीपल्स वेलफेयर सोसायटी चे संस्थापक अध्यक्ष व महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी आमदार स्मृती शेष डॉ. मधुकर राव वासनिक यांच्या द्वितीय स्मृती निमित्य स्मृती व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले. 'बुद्धिझम आणि विज्ञान' या विषयावर आधारित या व्याख्यान मालेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रातील प्रथितयश जेष्ठ हृदयरोग आणि डॉ. साहेबांचे स्नेही डॉ. शंकर खोब्रागडे यांना निमंत्रित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान पीपल्स वेलफेयर सोसायटीचे अध्यक्ष ऍड. मोहन वासनिक यांनी भूषविले.संस्थेचे सचिव श्री. मनोज वासनिक, संस्थेच्या सदस्या प्रा. निशा वासनिक आणि प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे यांची विशेष उपस्थिती होती.
सर्व प्रथम सर्व मान्यवरांनी आणि वासनिक परिवारातील सर्व सदस्यांनी स्मृती शेष डॉ. मधुकरराव वासनिक यांना आदरांजली वाहिली.
याप्रसंगी डॉ. खोब्रागडे बुद्धिझम आणि विज्ञान यांचा समन्वय मांडताना "जागतिक पटलावर प्रथम मनोवैज्ञानिक हे तथागत गौतम बुद्ध आहेत. बुद्ध तत्वज्ञान हे वैज्ञानिक विचारांनी आणि कृतीने ओतप्रोत भरलेले आहे. बुद्ध साहित्यात सर्व वैज्ञानिक विचार निकाय त्रिपिटक, अभिधम्म पिटक यामध्ये तथागत प्रणित सदाचरणात, प्रतित्य समुत्पाद सिद्धांतांत, अष्टांग मार्गात आणि पंच शिलात प्रतिबिंबित आणि प्रतिध्वनीत झालेले आहे. विज्ञान म्हणजे विश्लेषण नातून शोधलेली सत्यता हाच बुद्ध धम्माचा उत्क्रांती वाद आहे. बुद्धिझम आणि विज्ञान यामध्ये मैत्रीभाव आहे. प्रयोग शिलता आणि निसर्ग वाद हा विज्ञान आणि बुद्धिझम चा प्रमुख आत्मा आहे" अज्ञानातूनच विज्ञान निर्माण होते. त्यामुळेच बुद्ध धम्म अंगी कारल्या मुळेच चीन, जपान, सारख्या देशांची प्रचंड प्रगती झाली. असे विचार व्यक्त केले. आपला डॉ. साहेबांशी घालवलेला स्नेह पूर्ण दीर्घसहवास उलगडताना "डॉ. मधुकरराव वासनिक हे माझे शैक्षणिक गुरु आहेत. ते एक उत्तम वैद्यकीय तज्ञ, मार्गदर्शक होते. वंचित समाजातील वैद्यकीय विद्यार्थी आणि प्रतिनिधी यांच्या वर झालेला अन्याय दूर करण्यासाठी त्यांनी परकोटीचा संघर्ष केला आणि झुंझारपूर्ण लढा दिला. त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा विविध क्षेत्रात आपल्या अष्ट पैलू व्यक्तीमत्वातून उमटवीला". असे विचार व्यक्त केले.
संस्थेचे विद्यमान अध्यक्ष ऍड. मोहन वासनिक यांनी देखील डॉ. साहेबांच्या स्मृतिचा आलेख मांडला. डॉ. साहेबांच्या जाण्याने कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झालेली आहे. त्यांच्या प्रेरणेने हा वारसा आपण सचोटीने आणि निष्ठेने पुढे नेत राहू. असे आश्वासक अभिवादनपर विचार व्यक्त केले. डॉ. साहेब हे एक उत्तुंग आणि चिंतनशील समाज सुधारक होते. अशा शब्दात श्री मनोज वासनिक यांनी डॉ. साहेबांना श्रद्धांजली अर्पण केली.
या कार्यक्रमाची आयोजनपर भूमिका मांडताना, समाजातील प्रखर आणि ज्वलंत प्रश्नावर या स्मृती व्याख्यानमालेच्या माध्यमातून विचार मंथन व्हावे आणि हीच डॉ. साहेबांना खरी आदरांजली ठरेल. असे अभिवादन पर विचार प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे यांनी व्यक्त केले.
व्याख्यान मालेचे प्रमुख मार्ग दर्शक डॉ. शंकर खोब्रागडे यांचा परिचय सभागृहास डॉ. सुदेश भोवते यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. मनिषा नागपुरे यांनी केले तर आभार डॉ. सुमेध नागदेवे यांनी मानले. महाविद्यालय परिवारातील सर्व सदस्यांनी डॉ. साहेबाना आदरांजली वाहिली. स्मृती व्याख्यानमालेची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २९ मार्च २०२६


## राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचा आंतरराष्ट्रीय "व्हिजनरी लीडर अँड ट्रू चेंजमेकर" पुरस्काराने गौरव




**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** राज्याच्या ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा व स्वच्छता आणि सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभागाच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांना अमेरिकेतील यु.एस. इंडिया एसएमई कौन्सिल (U.S. India SME Council) तर्फे प्रदान करण्यात येणारा आउटस्टँडिंग व्हिजनरी लीडर अँड ट्रू चेंजमेकर (Outstanding Visionary Leader & True Changemaker) हा प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार बहाल करण्यात आला आहे. नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे बुधवारी (दि. २५ मार्च २०२६) आयोजित भव्य समारंभात त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.या समारंभास अमेरिकेतील मेरीलँड राज्याचे काउंटी एक्झिक्युटिव्ह मार्क अर्लिख, आंध्र प्रदेशचे एमएसएमई (MSME) व एनआरआय (NRI) रिलेशन्स मंत्री कोंडापल्ली श्रीनिवास, यूएस इंडिया एसएमई कौन्सिलचे चेअरमन सुधाकर गंधे, सीईओ एलिझा पुलिवार्थी तसेच नीरज खैरवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. भारत आणि अमेरिकेतील अनेक उद्योजकही या कार्यक्रमाला उपस्थित होते.राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांनी परभणी जिल्ह्यासह ग्रामीण भागात महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबवलेल्या उपक्रमांमुळे त्यांना हा सन्मान मिळाला आहे. महिला उद्योजकांना चालना देणे, 'लखपती दीदी' योजना, 'सिल्क अँड मिल्क' उपक्रम आणि एकल महिला सशक्तीकरण अभियान यांसारख्या उपक्रमांमुळे अनेक महिलांना आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग खुला झाला आहे.अमेरिका-भारत आर्थिक सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी कार्यरत असलेली यु.एस. इंडिया एसएमई कौन्सिल ही संस्था लघु व मध्यम उद्योगांना चालना देणे, नाविन्यपूर्ण उद्योजकता वाढवणे तसेच ऊर्जा, पायाभूत सुविधा, शाश्वत विकास, आरोग्य आणि ग्रामीण विकास क्षेत्रात सहकार्य वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांच्या या यशामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक विकासाच्या प्रयत्नांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाल्याची भावना व्यक्त होत असून, हा सन्मान राज्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

## गरीबीवर मात करत माळीवाडा गावातील तिघांची पोलीस दलात निवड; गावात जल्लोषात मिरवणूक



**दौलताबाद (जावेद अहमद) :** माळीवाडा गावातील दोन तरुण व एक तरुणी ची पोलीस दलात निवड गावात मिरवणूक काढण्यात आली गरीबीवर मात करत स्वप्नपूर्ती माळीवाडा गावाचा अभिमान उचवला दि. २७ माळीवाडा गावातील युवक-युवतींनी महाराष्ट्र पोलिस दलात यश संपादन करत गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.प्रशांत संजय कुरुंद यांची छत्रपती संभाजीनगर शहर पोलिस दलात निवड झाली परिस्थितीतून त्यांनी हे यश मिळवले आहे. या प्रतिकूल परिस्थितीवर मात करत प्रशांत यांनी पोलिस भरतीत यश मिळवले. त्यांना भाऊसाहेब गरजे व नामदेव जगधने यांचे मार्गदर्शन लाभले.तसेच माळीवाडा येथील प्रतिक्षा गिरजाराम पल्हाळ हिचीही छत्रपती संभाजीनगर पोलिस दलात नियुक्ती झाली आहे. साध्या कुटुंबातून येत तिनेही मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवले. अजिंक्य ज्ञानेश्वर जगधने याची बुलढाणा शहर पोलिस दलात निवड झाली आहे. सहा महिन्यांपूर्वी वडिलांचे अपघाती निधन झाले असतानाही अजिंक्य खचला नाही. पहिल्याच प्रयत्नात त्याने पोलिस भरतीत यश मिळवत जिद्दीचा आदर्श घालून दिला.या तिन्ही पोलीस विद्यार्थ्यांची गावातून वाजत गाजत मिरवणूक काढून त्यांचे सत्कार करण्यात आला सरपंच ज्योती नंदकुमार मुळेसंतोष हिवर्डे, सचिन फटांगडे, लक्ष्मण फटांगडे, छबू पेहरकर, वैभव आढाव, नंदकिशोर मूळे,उपसरपंच मनेश गाजरे,ग्रामपंचायत सदस्य कडू कीर्तिकर, धमपाल गायकवाड, प्रवीण बर्डे,कृष्णा मुळे, अनिता सुधाकर हेकडे व गणेश आस्वार,संतोष मूळे, प्रमोद साठे, सुनिल भगत व सर्व गावकर्यांनी त्याचे अभिनंदन केले.

## प्रवेशाच्या पलीकडे : सन्मान आणि अस्तित्वाचा लढा

दलित, बहुजन आणि आदिवासी (डीबीए) विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणाच्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये प्रवेश ही एक आधुनिक वस्तुस्थिती आहे. या तरुणांपैकी बरेच जण त्यांच्या कुटुंबाच्या इतिहासात पहिल्यांदाच विद्यापीठाच्या परिसरात पाऊल ठेवत आहेत. तथापि, मात्र, प्रवेश मिळवणे ही केवळ अर्धी लढाई आहे; खरी आव्हाने त्यानंतर सुरू होतात. ऐतिहासिक वंचितता आणि सामान्य आर्थिक परिस्थितीमुळे या विद्यार्थ्यांकडे 'सामाजिक भांडवलाची' कमतरता असते. उच्चभ्रू विद्यार्थ्यांकडे असलेले ओळखींचे जाळे, व्यावसायिक संबंध आणि 'अंतर्गत माहिती' या विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध नसते. यामुळे शैक्षणिक स्पर्धा त्यांच्यासाठी अधिक कठीण होते.

डीबीए सदस्यांचे काही सामाजिक उच्चभ्रू समवयस्क खोलवर रुजलेल्या पूर्वग्रहांनी प्रभावित असतात आणि त्यांना समान म्हणून स्वीकारण्यास अनेकदा संघर्ष करावा लागतो. हा बहिष्कार नेहमीच मोठ्याने किंवा उघडपणे होत नाही; तो अनेकदा सूक्ष्म आक्रमकतेतून घडतो. याचे उदाहरण म्हणजे, एखाद्या दलित रूममेटला टाळण्यासाठी विद्यार्थ्याने वसतिगृहातील खोली बदलणे, किंवा एखाद्या प्राध्यापकाने तोंडी परीक्षेत डीबीएच्या विद्यार्थ्याला ) जाणूनबुजून कमी गुण देणे. प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या राखीव जागा हेतुपुरस्सर रिक्त ठेवणे. जेव्हा या सूक्ष्म भेदभावाकडे दुर्लक्ष केले जाते, तेव्हा त्याचे रूपांतर मानसिक छळ किंवा शारीरिक हिंसाचारात होते. आयआयटी (IIT) आणि आयआयएम (IIM) सारख्या संस्थांमधील अशा स्वरूपाच्या विषारी वातावरणामुळेच अनेकदा 'संस्थात्मक हत्या' (उदा. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या) सारख्या दुर्दैवी घटना घडतात.

रोहित वेमुला आणि पायल तडवी यांसारख्या वंचित समाजातून आलेल्या विद्यार्थ्यांच्या दुःखद मृत्यूनंतर, डीबीए विद्यार्थ्यांची प्रतिष्ठा आणि करिअरचे रक्षण करण्यासाठी एका खऱ्या कायदेशीर संरक्षणाची सातत्याने मागणी होत आहे. हे आवश्यकही आणि महत्त्वाचे आहे कारण जातीय भेदभावामुळे निर्माण झालेल्या प्रतिकूल सामाजिक वातावरणाला तोंड देण्यासाठी बहुतांश विद्यापीठांमध्ये अजूनही अंतर्गत यंत्रणांचा अभाव आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने (UGC) २०१२ च्या कालबाह्य चौकटीच्या जागी 'समता नियमावली' प्रस्तावित केली. खऱ्या न्यायाच्या दिशेने उचललेले हे एक लोकशाही पाऊल होते. त्याचप्रमाणे, कर्नाटक सरकारने 'रोहित कायदा' लागू करण्याच्या प्रस्तावामुळे वंचित सामाजिक गटांना प्रभावी सामाजिक न्याय मिळवून देण्याच्या मागण्यांना अधिक बळ मिळाले आहे. मात्र, या निर्णयांना, विशेषतः नवीन यूजीसी नियमांना, काही उच्चभ्रू गटांकडून विरोध झाला आहे. त्यांच्या मते, हे नियम केवळ जातीय विभागणी वाढवतील किंवा त्यांचा वापर खोट्या तक्रारी दाखल करण्यासाठी केला जाईल. न्यायालयांनी पारंपरिकरित्या या सर्वसमावेशक उपाययोजनांचे संरक्षण केले आहे.

तथापि, सर्वोच्च न्यायालयाच्या एका खंडपीठाने अलीकडेच यूजीसीच्या नवीन नियमांना स्थगिती दिली आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयानेच सरकारला जातीय भेदभाव रोखण्यासाठी एक 'मजबूत यंत्रणा' तयार करण्याचे आदेश दिले होते. अनेक अधिकृत अहवालांनी हे आधीच सिद्ध केले आहे की, आयआयटी आणि आयआयएमसारख्या भारतातील सर्वोच्च संस्थांमध्येही बहिष्काराचे असे सूक्ष्म प्रकार अवलंबले जातात, ज्यामुळे डीबीए विद्यार्थ्यांच्या प्रगतीला खीळ बसते. उच्च शिक्षण संस्थांमधील दुर्बल सामाजिक गटांच्या हितांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी जुन्या संस्थात्मक यंत्रणांच्या मर्यादा तपासल्यानंतरच यूजीसी समता नियम किंवा रोहित कायदा विशेषतः तयार करण्यात आले.

या महत्त्वपूर्ण सुधारणांना होणारा विरोध हा केवळ प्रतिगामी सामाजिक उच्चभ्रू वर्गाचा संकुचित दृष्टिकोन दर्शवतो, कारण जातीय भेदभाव हा व्यवस्थेमध्येच रुजलेला आहे हे मान्य करण्यास ते तयार नाहीत. आरक्षण धोरणांमुळे डीबीएच्या विद्यार्थ्यांना विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळण्यास मदत झाली असली तरी, केवळ ही धोरणेच विद्यापीठांमधील दैनंदिन जीवनावर प्रभाव टाकणारे सामाजिक पूर्वग्रह पुसून टाकू शकत नाहीत. अनेकदा, या विद्यार्थ्यांच्या घटनात्मक हक्कांचे संरक्षण करण्याच्या प्रयत्नांना 'गुणवत्ते'साठी धोका किंवा सामाजिक ऐक्यासाठी धोकादायक म्हणून फेटाळून लावले जाते. या विचारसरणीमुळे भेदभाव सामान्य वाटू लागतो आणि सामाजिक न्यायासाठी आवाज उठवणाऱ्यांची खिल्ली उडवली जाते.

विद्यापीठे ही केवळ पदवी देणारी केंद्रे नसून ती समाजाच्या प्रगतीची आणि उत्क्रांतीची ठिकाणे आहेत. सामाजिक न्यायासाठी केवळ आरक्षण पुरेसे नाही, तर दैनंदिन जीवनातील पूर्वग्रह दूर करणारी संस्थात्मक यंत्रणा असणे ही काळाची गरज आहे. यूजीसीचे नियम किंवा रोहित कायद्यासारख्या त्यांच्या प्रादेशिक आवृत्त्या, हे आवश्यक उपाय आहेत आणि सरकार सामाजिक न्यायाप्रती आपली जबाबदारी गांभीर्याने घेत असल्याचे हे द्योतक आहे. शैक्षणिक संस्था ह्या सर्वांसाठी खऱ्या अर्थाने खुले ठेवण्याचे आणि लोकशाही मूल्ये जपण्याचे महत्त्वाचे साधन आहेत. संस्थात्मक संरक्षण नसेल तर उच्च शिक्षण संस्था त्यांच्या मूळ उद्देशापासून भरकटतील आणि केवळ मूठभर लोकांसाठीच मर्यादित राहतील.

- हरीश एस. वानखेडे, सेंटर फॉर पॉलिटिकल स्टडीज, जेएनयू (नवी दिल्ली)
- मराठी भाषांतर : प्रियदर्शन भवरे

साभार : डेक्कन हेराल्ड, २१ मार्च २०२६